स्थापना - ८/६/१९६७

''स्वच्छतेतून समृद्धीकडे''

# ग्रामपंचायत जुनेखेड

ता. वाळवा, जि. सांगली.

महात्मा गांधी तंटामुक्त अभियान

संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान

झाडे लावा, झाडे जगवा

इको व्हिलेज

# आरोग्य विभाग जुनेखेड

## जाहीर सूचना

मा. ग्रामस्थ बंधू-भगिनी,

आपल्या सर्वांच्या आरोग्य सुरक्षेसाठी केंद्र शासनाची आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना अत्यंत उपयुक्त योजना आहे. या योजनेअंतर्गत आयुष्मान भारत कार्ड (ABHA / ABHA-ID) तयार करून घेतल्यानंतर नागरिकांना खालील महत्वाचे फायदे मिळतात :

1. ५ लाख रुपयांपर्यंत मोफत आरोग्य विमा संरक्षण

– कुटुंबातील प्रत्येक सदस्यासाठी उपचार खर्च शासनामार्फत भरला जातो.

2. रुग्णालयात दाखल होण्यापूर्वीचे व नंतरचे उपचार मोफत

– तपासण्या, औषधे, उपचार यांचा खर्च योजनेतून कव्हर होतो.

3. शासनाने मान्यता दिलेल्या सर्व सरकारी व खाजगी रुग्णालयांमध्ये उपचार सुविधा

– लाभार्थी कोणत्याही संबद्ध रुग्णालयात उपचार घेऊ शकतात.

4. कॅशलेस उपचार सुविधा

– रुग्णालयात पैसे जमा करण्याची गरज नसते; खर्च थेट योजनेतून दिले जातात.

5. महत्वाच्या शस्त्रक्रिया मोफत

– हृदय, किडनी, कॅन्सर, सांधे, अपघात अशा मोठ्या शस्त्रक्रियांना कव्हर.

6. गरजू व आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांसाठी विशेषतः उपयुक्त

– आरोग्य खर्चाची चिंता कमी होऊन कुटुंब आर्थिकदृष्ट्या सुरक्षित राहते.

म्हणून सर्व पात्र ग्रामस्थांनी आपले आयुष्मान भारत कार्ड त्वरित तयार करून घ्यावे व या योजनेचा पूर्ण लाभ घ्यावा, ही नम्र विनंती.

समुदाय आरोग्य अधिकारी
आरोग्यवर्धिनी उपकेंद्र, जुनेखेड
ता.वाळवा, जि.सांगली

सरपंच
ग्रामपंचायत जुनेखेड
ता. वाळवा, जि. सांगली